# बदलता अमेरिकन

निळू दामले

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**बदलता अमेरिकन**
निळू दामले

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
निळू दामले
४१/४२, 'गुडविल', वनमाला टँक रोड,
माहिम, मुंबई- ४०००१६
फोन नं. ०२२-२४३०४७२०

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २७०/-

# बदलता अमेरिकन

# *न्यूयॉर्क रिव्ह्यू ऑफ बुक्स : वादचर्चा*

अनेक माणसं २००८ ची अमेरिकेची अध्यक्षीय निवडणूक अभ्यासत होती. मी त्यांच्यापैकी एक होतो.

मोहीम वर्षभर चालली. मॅक्केन आणि ओबामा यांच्यात जाहीर वादचर्चा अमेरिकेत अनेक विद्यापीठांमध्ये झाल्या. चर्चांमध्ये दोघेही अगदी शांतपणानं बोलत होते. एकमेकांवर व्यक्तिगत आरोप नव्हते. दोघेही अमेरिका आणि जगासमोर असलेले प्रश्न आणि त्यावर त्यांची उत्तरं काय आहेत ते मांडत होते. प्रत्येकाला काही मिनिटं दिलेली असत. वेळेची मर्यादा दोघांनीही पाळली. अभ्यासू प्राध्यापक चर्चेचं संचालन करत. अभ्यासू, जाणकार, मान्यवर मंडळी प्रेक्षकांत असत. प्रेक्षकांना टाळ्याबिळ्या वाजवायची परवानगी नव्हती. विद्यापीठात एखादा गंभीर वर्ग चालावा तशा या वादचर्चा होत असत.

न्यूयॉर्कर, न्यूयॉर्क रिव्ह्यू ऑफ बुक्स, इकॉनॉमिस्ट या पत्रांमधून मोहिमेवर खूप मजकूर येत होता. छोट्या खेड्यांत, कारखान्यांत, विद्यापीठांत, मोठ्या शहरांत उमेदवार जात तेव्हा तिथं काय होत होतं याचे तपशील प्रसिद्ध होत होते. न्यूयॉर्करचे बातमीदार अशा घटना अगदी सविस्तर मांडत होते.

मी हे सारं पाहत होतो. जगात इतरत्र होणाऱ्या निवडणुका, इराण किंवा चीनमध्ये न होणाऱ्या निवडणुका, भारतातल्या कंठाळी निवडणुका, मनात ठेवून ओबामा-मॅक्केन मोहीम पाहत होतो. मजा येत होती.

चार-पाच नोव्हेंबर २००८ रोजी मला 'स्टार माझा'नं लाईव्ह चर्चेसाठी बोलावलं. मतदानाचे आकडे बाहेर येत होते, ओबामांची विजयी घोडदौड चालू होती आणि मी मुंबईच्या स्टारच्या स्टुडिओत बसून अँकरच्या प्रश्नांना उत्तरं देत होतो. वर्षभराच्या काळात मला प्रचार मोहीम कशी दिसली ते मी बोललो. ओबामांनी लिहिलेली पुस्तकं मी वाचली होती. त्यांचेही संदर्भ देत होतो.

कार्यक्रम करताना मी खूश नव्हतो. एक करमणुकीचा कार्यक्रम करावा अशा रीतीनं माध्यमं हा विषय हाताळत होती. ओबामांचा विजय ही एक थरारक

गोष्ट होणार, हा विषय मोठ्या बातमीचा असणार असं लक्षात आल्यावर माध्यमं जागी झाली होती. आधीच्या वर्षं दोन वर्षांत काय घडलं होतं याची दखल त्यांनी घेतलेली नव्हती. शेवटचा निकाल हाती आला. ओबामांनी शपथ घेतली की, माध्यमं इतर थरारक विषयांकडं वळायला मोकळी होणार होती.

घरी परतल्यावर एक फोन आला. ''तुम्ही वेगळी माहिती देत होतात. प्रचार मोहीम कशी चालते ते आम्हाला माहीत नव्हतं. तुम्ही खूपच नव्या गोष्टी सांगितल्यात. तुम्हाला त्या कशा कळल्या, ते जाऊ द्या; पण नवी माहिती मिळाली. आभार.''

त्यानंतर दोन दिवसांनी नरेंद्र परचुरे यांचा फोन आला. ओबामा या विषयावर पुस्तक लिहा, असं म्हणाले. त्यांची माझी यापूर्वीची ओळख नव्हती. परचुरे म्हणाले, ''तुम्ही लिहायचंच आहे. तुम्हाला उद्या फोन करतो.''

मी माझ्या कामाच्या गडबडीत होतो. त्यामुळं हा विषय विसरून गेलो.

दुसऱ्या दिवशी परचुऱ्यांचा फोन. ''ओबामांची दोन्ही पुस्तकं तुम्ही वाचली आहेतच. आणखी पुस्तकं हवी असल्यास घ्या. दोन महिन्यांत आपलं पुस्तक प्रसिद्ध झालं पाहिजे. ओबामा शपथ घेतील त्या वेळी आपण दणक्यात पुस्तक लाँच करू.''

परचुरे घोड्यावर स्वार होते.

''तुमची कल्पना चांगली आहे. महत्त्वाच्या विषयावर तो विषय ताजा असतानाच एक पुस्तक झटकन टाकणं ही चांगलीच गोष्ट आहे. विषय ताजा असतानाच वाचक त्या विषयावरची माहिती वाचायला उत्सुक असतात. ओबामा निवडून आल्यानंतर दहा वर्षांनी त्यांच्यावरचं पुस्तक सर्वसाधारण वाचक वाचणार नाहीत. तेव्हा सर्वसाधारण वाचकाची गरज लक्षात घेऊन अशी अगदी गरमागरम, ताजी पुस्तकं टाकणं ही कल्पना चांगली आहे. इंग्रजीत अशी झटपट पुस्तकं खूप निघतात. तशी परंपरा आता महाराष्ट्रात तयार होते आहे. मी त्या धाटणीचं लिहीत नाही. त्यामुळं तुम्हाला माझा उपयोग नाही.'' मी म्हणालो.

''असं नका हो म्हणू. तुम्ही अनेक प्रयोग करता. मी तुमचं वाचलं आहे. तुमच्या दृष्टीनं हा एक प्रयोगच असेल. तुम्ही टाळू नका.'' परचुरे.

मी माझं म्हणणं सोडायला तयार नव्हतो. ''तुमची गरज, तुमची विनंती मी समजू शकतो; पण मला तसं लिहिणं जमणार नाही. वाचकांना ओबामा ही एक तत्कालिक गोष्ट वाटते, मला ती तशी पाहावी असं वाटत नाही. मी तटस्थपणे

ओबामांकडं पाहत आहे. मी ना प्रेमात, ना संशयात. दुसरं असं की, ओबामा हा माणूस मला एकटेपणानं दिसत नाही, समजत नाही. तो अमेरिकन समाजाचा एक भाग आहे. अमेरिकन समाज आणि ओबामा या दोन गोष्टी मी एकत्र पाहतो, एकत्र समजून घेतो. तेव्हा तुम्ही म्हणताय तसं पुस्तक मला शक्यच नाही.''

''बरं. मी विचार करतो. तुम्हीही विचार करा. मी दिलेली ऑफर शिल्लक आहे. दोन दिवसांनी भेटू.'' परचुरे म्हणाले.

दोन दिवसांनी परचुरे हजर. म्हणाले, ''चला माझ्याबरोबर माझ्या ऑफिसात. वाटेत आणि तिथं गेल्यावर बोलू.''

''ओबामा हा श्रीमंत माणूस नाही. ओबामा केनेडी-बुश यांच्यासारख्या बलवान घराण्यातला नाही. ओबामाच्या पाठी एखादी लॉबी नाही. बराक ओबामा हा एक विचार करणारा, मेहनतीनं आणि अभ्यासानं विचार करणारा माणूस आहे. त्यानं खूप वाचलंय. त्यानं खूप लिहिलंय. विचार आणि समाजातलं वास्तव या दोन्ही गोष्टी ओबामा ताडून पाहतो. ओबामा काळा आहे. ओबामा मी अमुक करेन, तमुक करेन असं म्हणत नाही. असा माणूस राजकारणाला आणि निवडणुकीला लायक नसतो. तरीही ओबामा नि:संशय बहुमतानं निवडून आला. हे प्रकरण साधं नाही. ओबामाची पुस्तकं मी वाचली आहेत. या माणसानं त्याच्या व्यक्तिगत आयुष्यात झगडा करत, स्वत:मध्ये बदल घडवत, खूप कमावलं आहे. सार्वजनिक जीवनातली त्याची कमाईची बाजू अजून जवळ जवळ कोरीच आहे. या माणसामध्ये क्षमता खूप आहेत; पण तो भविष्यात काय करेल ते सांगता येत नाही. लोकांनीही त्याला अगदी तुटपुंज्या ओळखीवर निवडून दिलं आहे. लोक आणि ओबामामधलं नातं अगदी आता आता तयार झालेलं आहे, ते अजून घट्ट झालेलं नाही. उद्या लोक त्याला हाकलूनही देतील. काहीच सांगता येत नाही. हा माणूस, त्याला निवडून देणारी अमेरिका या गोष्टी गुंतागुंतीच्या आहेत. त्यांची परिभाषा करणं कठीण आहे. या विषयावर अधिक वाचावं, चार लोकांना भेटावं, अमेरिका आणि ओबामा यांना यानिमित्तानं अधिक समजून घ्यावं असं मला वाटतं. मग लिहावं असं माझं मत आहे.'' मी.

''ठीक. तुम्हाला हे करायला किती वेळ लागेल?'' परचुरे.

मी हिशोब केला. एक फेरी अमेरिकेत करावी लागेल. याआधी अमेरिकेत जेव्हा जेव्हा गेलो होतो तेव्हा अमेरिकन मन समजून घ्यायचा प्रयत्न केला होताच. त्या वेळचे संदर्भ वेगळे होते. आता फिरायचं असेल ते निश्चित संदर्भ

घेऊन. अमेरिकेला जायचं म्हणजे बरीच खटपट. मे महिना सोईचा. दीडेक महिना तिथं राहणं. म्हणजे जून संपणार. त्यानंतर जमवलेले संदर्भ व पुस्तकं यांचं वाचन आणि लिखाण. म्हणजे ऑक्टोबर उजाडणार.

परचुरे तयार झाले.

मी जुळवाजुळव सुरू केली. पुस्तकं गोळा करायला सुरुवात केली. नेटवर जाऊन रिसर्च पेपर्स गोळा केले. एप्रिल-जूनदरम्यान अमेरिकेत फिरलो. वातावरण अनुभवलं. चर्चा केल्या. मुलाखती घेतल्या. परतल्यावर पुन्हा संदर्भ गोळा केले आणि शेवटी हे पुस्तक तयार झालं.

✦✦✦

# *गोरे*

४ नोव्हेंबर २००८.

बराक हुसेन ओबामा यांनी अमेरिकेच्या अध्यक्षपदाची शपथ घेतली.

बराक ओबामा यांचे जन्मदाते केनियन होते. काळे. बराक दोन वर्षांचे असताना त्यांनी बराकच्या आईला अमेरिकेत सोडून दिलं आणि ते केनियात परत गेले.

बराक ओबामा यांची आई, ॲन डनहॅम (Ann Dunham) गोरी अमेरिकन, कन्सासमधली. बराक आईसारखे गोरे नाहीत, वडिलांसारखे काळे आहेत. बराक यांची काळी कातडी आणि डोक्यावरचे आफ्रो केस यावरून दुरूनही ते आफ्रिकन काळे, आहेत हे लक्षात येतं.

बराक ओबामांचा शपथविधी झाला तेव्हा करोडो माणसं, जगभरची, 'ओऽऽबाऽऽमा' – 'ओऽऽबाऽऽमा' अशा घोषणा देत होती. खूश होती.

काही माणसं म्हणत होती की, बराक ओबामा 'ओरियोज' बिस्किटासारखे आहेत. ओरियोज हे एक गडद चॉकलेटी रंगाचं गोल बिस्कीट असतं. दोन चकत्या, त्यांच्यामध्ये शुभ्र पांढऱ्या क्रीमचा एक थर. सँडविचसारखं बिस्कीट. बाहेरून काळं, आतून गोरं. अमेरिकेत बरेच काळे सुखवस्तू लोक आहेत. गोऱ्या समाजाला मिळणारी सर्व सुखं ते उपभोगतात, गोऱ्यांमध्ये मिसळतात. गोऱ्यांमध्ये सामावलेले आहेत. ओरियोज हे त्यांना दिलेलं नाव.

''बराक ओबामा कसला आलाय काळा, हा बाहेरून काळा आहे आणि आतून गोरा आहे.'' अनेक लोक पुटपुटले.

असे बराक हुसेन ओबामा, अमेरिकेचे पहिले काळे अध्यक्ष झाले.

✦

मार्क ट्वेनच्या १८९४ साली प्रसिद्ध झालेल्या टॉम सॉयर अब्रॉड या कादंबरीत टॉम नावाचं एक पात्र आहे. टॉम नुकत्याच गुलामगिरीतून मुक्त झालेल्या रॉक्सी नावाच्या स्त्रीचा मुलगा आहे. रॉक्सी काळी असली तरी पूर्ण

काळी नाही. तिचा रंग गोरेपणाकडं झुकणारा. त्यामुळं टॉम मानत असे की, आपण गोरे आहोत.

एका क्षणी रॉक्सी टॉमला सांगते ''तू निग्रो आहेस. तू निग्रो म्हणूनच जन्मला आहेस, गुलाम म्हणूनच जन्मला आहेस. देवानं हॅमला (Ham) दिलेला शाप तुझ्या डोक्यावर आहे.''

निग्रो?

निग्रो म्हणजे काळे. आफ्रिकेतले. जाड ओठांचे. रुंद, चपट्या नाकाचे. एकेकाळी मानववंश शास्त्रज्ञांनी माणसांची वंशामध्ये वर्गवारी केली. त्यात गोरे लोक श्रेष्ठ आणि काळे कनिष्ठ असं वर्गीकरण केलं. काळ्यांचा वर्ग त्यांनी 'निग्रॉईड' असा ठरवला. निग्रो हे निग्रॉईडचं बोली भाषेतलं संक्षिप्त रूप. निग्रोंना अमेरिकेत अधिक अपमानास्पद वाटेल अशा निगर या नावानं हाक मारत. अलीकडल्या काळात काळ्यांनी निग्रो हा शब्द अपमानास्पद ठरवला असून ते स्वत:चं वर्णन काळे किंवा आफ्रिकन अमेरिकन असं करतात.

**हॅमचा शाप?**

आफ्रिकन माणसं काळी आणि गुलाम झालीत ती त्यांना देवानं दिलेल्या शापामुळं, ही श्रद्धा मार्क ट्वेनच्या काळात, त्या आधी कित्येक शतकं आणि त्यानंतर अगदी परवा परवापर्यंत गोऱ्यांच्या मनात पक्की होती. आजही काळी माणसं कमी प्रतीची असतात, असं मानणारी खूप माणसं अमेरिकेत आणि युरोपात आहेत. युरोप-अमेरिकेतच का, रशिया आणि भारतातही बहुतांश माणसं तसं मानतात.

त्यांच्या या समजुतीची मुळं बायबलमध्ये सापडतात.

डेव्हिड गोल्डनबर्ग यांनी The Curse of Ham : Race and Slavery in Early Judaism, Christianity and lslam या पुस्तकात काळेपण आणि गुलामगिरी या दोन गोष्टींचा इतिहास मांडला आहे.

काळे गुलाम म्हणूनच जन्मले आणि गुलामगिरीच त्यांच्या कपाळी कायमची लिहिली गेली आहे, हा समज बायबलमधून, ओल्ड टेस्टमेंटपासून (जुना करार) सुरू होतो. ख्रिस्ती लोकांचं धर्म पुस्तक दोन भागांत आहे. ओल्ड टेस्टमेंट आणि न्यू टेस्टमेंट.

जुन्या करारात विश्वाच्या निर्मितीची गोष्ट आहे. विश्वातल्या वाईट गोष्टींचा निपात करून एक नवं जग निर्माण करायचं देवानं ठरवलं. त्यानं एक महाप्रलय